# प्रेसनोट

दि.३१/०५/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७, |
| आरोपीचे नांव व कार्यालय | रमेश श्रीहरी सुरुंग, वय-४५ वर्ष, जिल्हा खादी ग्रामाद्योग अधिकारी, वर्ग-२, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग कार्यालय, अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ५,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ५,०००/- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय अहमदनगर मार्फत पंतप्रधान रोजगार निर्मिती योजने अंतर्गत पेव्हर ब्लॉक व्यवसाय सुरु करण्यासाठी रु.२५,००,०००/- चे कर्ज प्रकरण सहा महिन्यापुर्वी बँक ऑफ महाराष्ट्रा, शाखा हंगेवाडी, ता.श्रीगोंदा येथे दाखल केले आहे. सदर प्रकरण अद्याप प्रलंबित असून, ते संबंधीत बँक मॅनेजरकडुन लवकर मंजुर करुन घेऊन सदर प्रकरणाची सबसीडी लवकर मिळवून देणेकरीता आरोपी लोकसेवक रमेश श्रीहरी सुरुंग, जिल्हा खादी ग्रामाद्योग अधिकारी, वर्ग-२, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग कार्यालय, अहमदनगर यांनी तक्रारदार यांचेकडे ५०००/- रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिलेल्या तक्रारीवरुन आज दि.३१/५/२०२१ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणीत आरोपी लोकसेवक सुरुंग यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष ५०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन आज दि.३१/५/२०२१ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती अहमदनगर येथे आयोजित लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक सुरुंग यांनी तक्रारदार यांचेकडुन ५०००/- रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वीकारली असता आरोपी लोकसेवक सुरुंग यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:- ९९३०९९७७००

31.05.21

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर